आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.००वाजता

६ सप्टेंबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत महाराष्ट्र देशात अव्वल

- गणेशोत्सवाच्या तयारीचा सर्वत्र उत्साह

- जलसंचयाचा थेट संबंध आर्थिक प्रगतीशी असून, पाण्याचं योग्य व्यवस्थापन गरजेचं असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन / गुजरातमध्ये सूरत इथे 'जलसंचय जन भागीदारी' अभियानाचं केलं उद्धाटन

**आणि**

- आयुष मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या वैद्यकशाखांच्या विद्यार्थ्यांसाठी आता नॅशनल एक्झिट टेस्ट अनिवार्य

**<><><><><>**

परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात गेली दोन वर्ष सातत्यानं देशात अव्वल स्थानी असलेल्या महाराष्ट्रानं चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतही हे स्थान टिकवून ठेवलं आहे. एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीत देशातल्या एकूण गुंतवणुकीच्या ५२ पूर्णांक ४६ शतांश टक्के म्हणजेच सुमारे ७० हजार ७९५ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज एक्स माध्यमाद्वारे ही माहिती दिली. इतर आठ राज्यांमधल्या परकीय गुंतवणुकीच्या बेरजेपेक्षा अधिक गुंतवणूक आणण्यात राज्य सरकार यशस्वी झाल्याचं त्यांनी सांगितलं. या यादीत दुसर्या क्रमांकावर कर्नाटक, तिसर्या

क्रमांकावर दिल्ली, चौथ्या क्रमांकावर तेलंगणा तर पाचव्या क्रमांकावर गुजरात या राज्यांचा समावेश आहे.

<><><><><>

नुकत्याच संपलेल्या ऑगस्ट महिन्यात देशभरात चाळीस लाखांहून अधिक नवीन डिमॅट खाती उघडण्यात आली. यामुळे देशातल्या डिमॅट खात्यांची संख्या १७ कोटी १० लाखांवर पोहोचली आहे. ऑगस्ट महिन्यात बाजारात विक्रमी संख्येनं आय पी ओ दाखल झाले आणि विविध कंपन्यांनी त्यांच्या माध्यमातून सुमारे १७ हजार कोटी रुपयांचं भांडवल उभारण्याचा मार्ग निवडला, त्यामुळे डिमॅट खात्यांमध्येही वाढ झाली, असं सेबीनं सांगितलं. निव्वळ आय पी ओ मध्ये सहभागी होण्यासाठी गुंतवणूकदार डिमॅट खाती उघडत आहेत, याशिवाय या वर्षात शेअर बाजार निर्देशांकांनी मोठी उसळी घेतल्यानं बाजारानं चांगला परतावा दिला आहे, यामुळे शेअर बाजाराकडे गुंतवणूकदारांचा कल वाढला आहे, असं सेबीच्या अभ्यासात आढळून आलं आहे.

<><><><><>

राज्यात गणेशोत्सवाची धामधुम सुरू झाली आहे. गणेश चतुर्थीच्या दिवशी उद्या सर्वत्र श्री गणेशाची प्रतिस्थापना होणार असून आज पासूनच अनेक ठिकाणी गणेश मूर्तींचं आगमन होत आहे. तसंच गणरायाचं स्वागत करण्यासाठी घरोघरी लगबग सुरू आहे. उत्सवासाठी आवश्यक सामानानं मुंबईसह राज्यात सर्वत्र बाजारपेठा फुलल्या असून भाविकांची खरेदीसाठी झुंबड उडाली आहे. त्यातच पावसाच्या मध्येच होणाऱ्या शिडकाव्यामुळे ग्राहकांची काहीशी धांदलही उडत आहे. आज घरोघरी हरितालिका पूजनही झाले.

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असते. त्यामुळे कोकणात जाणाऱ्या मार्गावरली वाहतूक सुरळीत राहण्यासाठी या काळात जड वाहनांची वाहतूक बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी काल वार्ताहरांशी बोलताना दिली. तसंच या उत्सवानिमित्त गणपती आरती ॲपची निर्मिती केल्याचंही चव्हाण यांनी सांगितलं. ravindrchavan.com या संकेतस्थळावर गणपतीच्या आरतीचे व्हिडीओ आणि ऑडिओ उपलब्ध करून दिले जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान, गणेशोत्सवासाठी मुंबईतून रत्नागिरीत येणाऱ्या भाविकांसाठी पोलिसांनी १८ ठिकाणी मदत केंद्र उभारली आहेत. या केंद्रांवर पिण्याचं पाणी तसंच आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दरम्यान मुंबई - गोवा महामार्गावर आज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्यांचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

गणेशोत्सवानिमित्त राज्यात विविध ठिकाणी पर्यावरणपूरक प्लास्टिकमुक्त स्पर्धेसारख्या अनेक स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे. **नवी मुंबईत** पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. अनेक जिल्ह्यांमध्ये बचत गटांमार्फत गणेश मूर्ती आणि सजावटीच्या साहित्याची विक्री केली जात आहे.

**ठाण्यात** कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानं 'ठाणं बदलतंय…' या विषयावर देखावा उभारला आहे. गेल्या काही वर्षात ठाणे इथं झालेल्या प्रगतीचा सर्वांगीण आढावा या देखाव्यात घेण्यात आला आहे. या देखाव्यातून शासन, विविध महामंडळं, महानगरपालिका यांच्या योजनांच्या अंमलबजावणीची माहितीही दाखवण्यात येणार आहे.

गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणं गरजेचं आहे. त्यामुळे प्लास्टर ऑफ पॅरिसची मूर्ती न वापरता शाडू मातीच्याच मूर्तीची प्रतिष्ठापना करावी असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. दरम्यान, हा उत्सव एकोप्याने आणि आनंदाने साजरा करण्याचं आवाहन स्थानिक प्रशासनाच्या वतीने करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

शिक्षणक्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ८२ शिक्षकांना काल शिक्षक दिनानिमित्त गौरिवण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज पुरस्कारप्राप्त शिक्षकांशी संवाद साधला. पुण्याच्या रामकृष्ण मोरे महाविद्यालयातल्या प्राध्यापिका शिल्पा गौरी गणपुले यांचा यात समावेश होता. प्राध्यापक गणपुले यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया व्यक्त केली…

**होल्ड बाईट….**

**<><><><><>**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने, २०२४-२५ या वर्षासाठी, राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजनेसाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना, अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत या महिन्याच्या ३० तारखेपर्यंत वाढवण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातल्या गुणवंत विद्यार्थ्यांची आठव्या इयत्तेनंतर होणारी गळती रोखण्यासाठी तसंच त्यांना त्यांचं शालेय शिक्षण १२वी पर्यन्त पूर्ण करण्यासाठी, प्रोत्साहन देण्याच्या हेतूनं ही शिष्यवृत्ती दिली जाते.

**<><><><><>**

जलसंचयाचा थेट संबंध आर्थिक प्रगतीशी असून, पाण्याचं योग्य व्यवस्थापन गरजेचं असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. गुजरातमधे सूरत इथं, 'जल संचय जन भागीदारी' या अभियानाचा प्रारंभ दूरस्थ पद्धतीनं केल्यानंतर ते बोलत होते. भारतात पाण्याला ईश्वराचं रूप मानलं असून पाण्याच्या साठवणीच्या अनेक शास्त्रशुद्ध पद्धती भारतात परंपरेनं विकसित झाल्या आहेत. काही ठिकाणी अतिवृष्टी तर काही ठिकाणी पाण्याची टंचाई या समस्यांवर जलसंचयानेच तोडगा निघू शकतो, असं ते म्हणाले. सध्या सुरू असलेल्या 'जल शक्ति अभियानाशी' हे अभियान संलग्न असणार आहे. या अभियानाद्वारे गुजरात राज्यातील जनता, स्थानिक स्वराज्य संस्था, उद्योगसंस्थाना पावसाच्या पाण्याचं पुनर्भरण अर्थात 'रेन वॉटर हार्वेस्टींग' करण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक सुविधा उभारण्यासाठी एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. या अभियानाअंतर्गत, गुजरातमध्ये सामुदायिक भागीदारीतून सुमारे २४ हजार ८०० बांधकामं केली जात आहेत.

**<><><><><>**

आयुर्वेद, युनानी आणि होमिओपॅथी शाखांमध्ये २०२१-२२ पासून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना नॅशनल एक्झिट टेस्ट अर्थात एन ई एक्स टी देणं अनिवार्य असणार आहे, अशी घोषणा केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी काल केली. या संदर्भात विद्यार्थ्यांच्या शंकांचं निरसन करण्याच्या दृष्टीनं स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशीनुसार हा निर्णय घेण्यात आल्याचं त्यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमध्यमांशी बोलताना सांगितलं. एक वर्षांची आंतरवासिता अर्थात इंटर्नशीप पूर्ण केल्यानंतर राज्य अथवा राष्ट्रीय स्तरावर परवाना मिळवण्यासाठी तसंच नोंदणी करण्यासाठी ही परीक्षा देणं अनिवार्य राहील.

**<><><><><>**

अकोला जिल्ह्याच्या अकोट तालुक्यातल्या बोर्डी इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेनं 'मुख्यमंत्री - माझी शाळा सुंदर शाळा' अभियानात पहिला क्रमांक पटकावला आहे. अभिनव शिक्षण पद्धतीसह या शाळेत कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प, स्वच्छता दूत प्रकल्प, पुस्तकांची शाळा, इंग्लिश क्लब, सायन्स क्लब, भाषा क्लब, स्काऊट गाईड यांसारखे विविध उपक्रम राबवले जात आहेत.

**<><><><><>**

भंडारा पोलिसांनी काल रात्री १६७ किलो गांजा पकडला. गोपनीय माहितीच्या आधारे वाहनांची तपासणी करून पोलिसांनी या प्रकरणी दोघांना ताब्यातही घेतलं. या दोघांवर अंमली पदार्थ कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या वाडा तालुक्यात नेहरोली या गावात एकाच कुटुंबातल्या तिघांची हत्या करून फरार झालेल्या आरोपीला पालघर पोलिसांनी उत्तर प्रदेशातल्या प्रयागराज इथून अटक केली आहे. १७ ऑगस्ट रोजी हा भाडेकरू संबंधित कुटुंबियांची हत्या करून, त्यांच्या घरात चोरी करून पळून गेला होता. श्वानपथकाच्या सहाय्यानं पोलिसांनी त्याचा माग काढून त्याला अटक केली.

**<><><><><>**

२० वर्षांपेक्षा कमी वयोगटासाठीच्या जागतिक महिला कुस्ती स्पर्धेत भारताच्या ज्योती बरवालने सुवर्णपदक पटकावलं आहे. स्पेनमधे पोंतेवेद्रा इथं ही स्पर्धा झाली. ७६ किलो वजनी गटाच्या फ्री स्टाईल प्रकारात ज्योती बरवालने युक्रेनच्या मारिया ऑर्लेविचला एकही गुण मिळू न देता तिचा दणदणीत पराभव केला.

६८ किलो वजनी गटात सृष्टीनं तर ५९ किलो वजनी गटात कोमलनं कांस्यपदक पटकावलं. ६२ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात भारताच्या निकीताची लढत युक्रेनच्या इरिना बोंदारबरोबर होईल. पुरुषांच्या स्पर्धा आजपासून सुरु होणार आहेत.

<><><><><>

अकोला जिल्ह्याला गेल्या रविवारी आणि सोमवारी बसलेल्या अतिवृष्टी आणि पुराच्या तडाख्यात सुमारे ४१ हजार ८८६ हेक्टरवरच्या पिकांचं नुकसान झालं आहे. या सोबतच ८२ घरांची पडझड झाली असून जिल्हा प्रशासनामार्फत नुकसानीचे पंचनामे करून प्राथमिक अहवाल अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.

<><><><><>

मेजर ध्यानचंद यांची जयंती आणि राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं नुकत्याच आयोजित केलेल्या ‘खेल उत्सव २०२४‘ मध्ये क्रिकेट, हॉकी, बॅडमिंटन आणि टेबल टेनिस या क्रीडाप्रकारांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. नवी दिल्लीच्या मेजर ध्यानचंद स्टेडिअमवर झालेल्या या खेल उत्सवात मंत्रालयाचे २०० हून अधिक अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते.

//<><><><><>//